# सभासदांसाठी विशेष सूचना

१) **कर्जाचा व्याजासह प्रथम हप्ता येण्याचा कालावधी** :- वसुल यादी जाणेपुर्वी कर्ज रोखा पेड केला असेल तर त्याचा पहिला व्याजासह कर्ज हप्ता पुढील महीन्याचे शेवटच्या तारखेस येईल व वसूल यादी पाठवले नंतर कर्ज रोखा पेड झाला असेल त्या कर्जाचा पहीला व्याजासह कर्ज हप्ता पुढील महिन्याच्या वसूल यादीत पाठवुन तो त्या पुढील महिन्याचे शेवटचे तारखेपर्यत वसूल केला जाईल. तसेच त्याची कर्ज फेड मुदत ही पहीला व्याजासह कर्ज हप्ता वसुली पासुन ते अखेरचा व्याजासह कर्ज हप्ता वसुलीचे महिन्याचे अखेरच्या तारखे पर्यत असेल. रिझर्व बँकेने एन.पी.ए बाबत जे नियम दिलेले आहेत त्या निकषांचे अनुषंगाने कर्जाचे मुद्दल किंवा व्याज थकीत कालावधीनुसार (स्पेशल मेन्शन अकौंट) वर्गीकरण केलेले आहे.

अ) ०१ ते ३० दिवस थकीत असल्यास – S.M.A – 0 , होण्याचा दिनांक
ब) ३१ ते ६० दिवस थकीत असल्यास – S.M.A – 1, होण्याचा दिनांक
क) ६१ ते ९० दिवस थकीत असल्यास – S.M.A – 2 , होण्याचा दिनांक

कर्ज खात्यावरील मुद्दल व येणे व्याज रक्कम विचारात घेऊन सदर एकुंण येणे रक्कम ९० दिवस व त्यापेक्षा जास्त कालावधीत वसुल न झाल्यास सदर खाते एन.पी.ए खाते ग्राहय धरण्यात येईल.

व्याजासह कर्ज हप्ता जमा झालेचे तारखे पासून पुढे ९० दिवस जर कराराप्रमाणे कर्जाचा मुद्दल व व्याज भरणा झाला नाही तर सदरचे कर्ज थकीत समजले जाईल व त्यास दररोज सीबीएस माध्यमातून एन पी ए मार्किंग केले जाईल. कर्ज खाती नियमित पध्दतीने वसूल होत असेल तर सदरचे खाते उत्कृष्ट (Standard) समजले जाईल, जर कर्ज खाते एक वर्षापर्यत थकीत राहील्यास त्यास निकृष्ट (SubStandard) समजले जाईल आणि जर एक वर्षा पेक्षा जास्त दिवस कर्ज खाते थकले तर त्यास संशयास्पद (Doutful) खाते समजले जाईल. तसेच आपत्कालीन परिस्थितीत रिझर्व बँकेच्या आदेशानुसार वसूली बाबतीत बदल केले जातील. व थकीत वसूलीसाठी जामीनदार व माझे विरूध्द बँक कायदेशीर कारवाई करेल. कर्ज खाती एन पी ए मार्किंग झालेनंतर सभासदाकडे बँकेचे असणारे सर्व कर्ज एन पी ए होतील व त्याची संपूर्ण थकीत मुद्दल व व्याज भरणाझाले शिवाय कर्ज खाते एन पी ए मधुन बाहेर येणार नाही व अशा सभासदास बँक कोणतेही कर्ज देणार नाही याची नोंद घ्यावी.